# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०९/२०२२** **दिनांक २२.०९.२०२२**
**स्थळ- जिल्हा न्यायालय, अहमदनगर** **वेळ- संध्याकाळी ०६.०० वाजता**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व १००/२०२१ (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा गुरुवार दि.२२/०९/२०२२ रोजी संध्याकाळी ०४.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/२४८१/२०२२, दि.२२.०९.२०२२ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा गुरुवार दि.२२/०९/२०२२ रोजी संध्याकाळी ०६.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.**

१. **मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.**

२. **मा.डॉ.राजेंद्र भोसले, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी अहमदनगर तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.**

३. **मा.श्रीमती भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तथा सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती, यांचे वतीने उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.राहूल जाधव उपस्थित होते.**

---

**विषय नं.०१** **दि.२६.०८.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५०६** **चर्चा केली, एकूण ८२ विषय आहेत, तदर्थ समितीने नुकताच कार्यभार स्वीकारलेला आहे, कमी वेळ मिळाल्यामुळे नियमित पुढील बैठकीत हा विषय क्र.१ घेण्याचे ठरवले.**

**(कार्यवाही- सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.०२** **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव–२०२२ साजरा करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.५०७** **अंदाजपत्रकात दाखविलेल्या रकमांचा तपशील सध्या उपलब्ध नाही म्हणून तपशीलवार माहितीसह पुन्हा विषय समितीसमोर ठेवावा. आवश्यक माहिती देण्यासाठी संबधीत विभागप्रमुख किंवा त्यांचे जबाबदार कर्मचारी यांना पुढच्या बैठकीसाठी हजर ठेवावे. वार्षिक बजेटमध्ये त्याची तरतुद करण्यात आली कींवा नाही, केली नसल्यास का केलेली नाही, याची सुध्दा माहिती देण्यात यावी.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

| | |
|---|---|
| **विषय नं.०३** | **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२२ मधील उत्सवातील वीणा, पोथी, फोटो, पाद्यपुजा, रुद्राभिषेक इत्यादी साठी मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सदस्यांची नावे निश्चीत करणेबाबत.** |
| **निर्णय क्र.५०८** | **दि.०४.१०.२०२२ रोजी समिती सदस्य डॉ.राजेंद्र भोसले पोथी घेतील व श्रींची पाद्यपुजा करतील. विणा व प्रतीमा कोण घेतील याचा निर्णय सदस्य सचिव यांनी घ्यावा. दि.०५.१०.२०२२ रोजी अध्यक्ष पोथी घेतील व पाद्यपुजा करतील. भिक्षा झोळीसाठी अध्यक्ष व दोन्ही सदस्य हजर असतील. आराधना विधी अध्यक्ष यांचे हस्ते होईल.** |

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

| | |
|---|---|
| **विषय नं.०४** | **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२२ आयोजित करावयाच्या कीर्तन व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी कलाकार व मानधन निश्चित करणेबाबत.** |
| **निर्णय क्र.५०९** | **प्रस्तावातील 'अ' भाग मान्य करण्यात आला. सौ.अंजली जोशी यांचा किर्तन कार्यक्रम करण्यासाठीचा प्रस्ताव मंजूर,<br>प्रस्तावातील 'ब' भागासाठी श्री.प्रकाश खांडगे किंवा अन्य यांना व या विषयासंदर्भात तज्ञ व अनुभवी व्यक्तींकडे सदरची नावे पुरविण्यात यावीत व त्यांचेकडून अभिप्राय मागविण्यात यावा आणि पुढील सभेसमोर विषय ठेवण्यात यावा.<br>श्री.प्रकाश खांडगे, मुंबई विद्यापीठ यांना पत्र लिहितांना, स्तंभ क्र.६ व ७ वगळून यादी पाठविण्यात यावी.** |

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

| | |
|---|---|
| **विषय नं.०५** | **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२२ मध्ये श्री.संजय जोशी, नांदेड यांचा 'गीत रामायण' कार्यक्रम सादर करणेबाबत.** |
| **निर्णय क्र.५१०** | **श्री. संजय जोशी, नांदेड यांचा वरील निर्णयाप्रमाणे 'गीत रामायण' कार्यक्रम सादर करणेबाबत समावेश करण्यात यावा.** |

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

| | |
|---|---|
| **विषय नं.०६** | **संस्थानचे हैद्राबाद, बेंगलोर व चेन्नई येथील माहिती केंद्रातील कुशल कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन व मुदतवाढीबाबत.** |
| **निर्णय क्र.५११** | **या माहिती केंद्रातील कुशल कंत्राटी कर्मचा-यांची कार्यक्षमता, सेवा तत्परता याबाबत विभाग प्रमुखाकडून अहवालासोबत हा विषय पुन्हा ठेवावा.** |

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

| | |
|---|---|
| **विषय नं.०७** | **संस्थानचे कायम व कंत्राटी कर्मचा-यांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत.** |
| **निर्णय क्र.५१२** | **हा विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)** |

---

| | |
|---|---|
| **विषय नं.०८** | **मौजे शिर्डी ता.राहाता येथील सि.स.नं ९३ क्षेत्र ९३.७ चौ.मी.या श्री व्दारकामाई मंदिराचे दक्षिण बाजूकडील मिळकत व त्यासमोरील मोकळी जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे नावे होणेबाबत.** |
| **निर्णय क्र.५१३** | **प्रस्ताव, प्लॅन तयार करुन संबधीत दस्तऐवजासह विषय पुढील सभेत ठेवावा. यासाठी कोणी देणगीदार हे काम करण्यास तयार आहे काय याचा विचार करावा. आवश्यकता भासल्यास या विषयाबाबत मा.उच्च न्यायालयासमोर सिव्हील ॲप्लीकेशन करण्याची तरतुद ठेवावी.** |

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

विषय नं.०९ श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारत बांधकाम प्रकल्पाचे लेबर कॅम्प येथे घडलेल्या घटनांबाबत व प्रकल्पाचे सद्यस्थितीबाबत तसेच ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई यांनी मुदतवाढ मिळणेसाठी केलेल्या विनंतीबाबत.

निर्णय क्र.५१४ आवश्यक माहिती अभावी सदरचा विषय तहकूब करण्यात आला.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.१० आयकर कायदा १९६१ च्या तरतुदीनुसार आर्थिक वर्ष २०२२-२३ अखेर रु.३०९ कोटी अखर्चित उत्पनाचा विनियोग करणेबाबत.

निर्णय क्र.५१५ आवश्यक माहिती अभावी सदरचा विषय तहकूब करण्यात आला.

(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)

---

विषय नं.११ आयकर विभागाच्या रु.४९८ कोटी कर भरणा नोटीसा तसेच आयकर विषयक कामकाजाची सद्यस्थिती.

निर्णय क्र.५१६ आवश्यक माहिती अभावी सदरचा विषय तहकूब करण्यात आला.

(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेचा विषयावर चर्चा करण्यात आली.

आयत्या वेळेचा
विषय नं.१

निर्णय क्र.५१७ समिती सदस्य डॉ.राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी यांनी प्रस्ताव मांडला की, हार फुले बंद केलेचे निर्णयाबाबत पुनर्विचार करावा किंवा कसे यासाठी पुढील सभेमध्ये सविस्तर विषय ठेवण्यात यावा. याकरीता शिर्डी परिसरात फुल उत्पादनाची उलाढाल किती होते, महामारीचे कालावधीचे अगोदर संस्थान प्रत्यक्ष रित्या किती फुलांची खरेदी करत होते व अप्रत्यक्षरित्या विक्रेता किती खरेदी करत होते, याची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. या विषयाला अध्यक्ष यांनी अनुमोदन दिले.

(कार्यवाही- संरक्षण विभाग/मंदिर विभाग/ बगीचा विभाग)

---

वरील निर्णय क्र.५०६ ते ५१७ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायं. ८.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत /-
(राहूल जाधव)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती करिता

स्वाक्षरीत/-
(डॉ.राजेंद्र भोसले)
जिल्हाधिकारी अहमदनगर तथा
सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

स्वाक्षरीत/-
(सुधाकर यार्लगड्डा)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा
अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.